महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२२-२३/ १९० दिनांकः- 11 JAN 2023

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :-डीबीटी पोर्टलव्दारे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेण्याबाबत तसेच संस्थांच्या लॉगीन ला प्रलंबित असलेले अर्ज निकाली काढण्याबाबत.

संदर्भः- मा. संचालक, तंशिसं,म.रा.मुंबई, यांचे कार्यासन क्र. १८ यांचे दि. ११/०१/२०२३ रोजीचा प्राप्त ई-मेल.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, महाडिबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज (नवीन /नुतनीकरण ) या विभागातर्गत येत असलेल्या संस्थांच्या लॉगीन ला सद्यस्थितीत **एकुण ५७७७** विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झालेले आहे.

त्याअनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संचालनालयांमार्फत राबविण्यात येणा-या योजनांतर्गत आपल्या संस्थेतील शिकणा-या पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवरील अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरुन घेण्याबाबत व मंजूरीस्तव पाठविण्याकरिता **दि. ३१/०१/२०२३ पर्यत** मुदत देण्यात आलेली आहे. तरी, सर्व संस्थेने शेवटच्या वेळेमुदतीत विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूरीकरिता न पाठविता आपल्या लॉगीन ला सद्यस्थितीत प्रलंबित असलेले तसेच प्राप्त झालेले अर्ज संस्थांच्या दोन्ही लॉगीन (Principal & Clerk Login ) मधून **संबंधित योजनेंच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करून वेळोवेळी निकाली काढण्यात यावे.**

तसेच काही संस्थांनी त्यांच्या लॉगीन मधून शिष्यवृत्तीच्या अर्जाची तपासणी न करता विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयास ऑनलाईनरित्या पाठविण्याबाबतचे निर्दशनास आलेले आहे. तरी आपणास सुचित करण्यात येते की, **तपासणी न करता किंवा वारंवार त्रुटीअभावि परत करण्यात आलेले अर्जाची पुर्तता न करता मंजूरीस्तव पाठविण्यात आलेले विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित योजनेंकरिता पात्र नसल्याचे आढळल्यास, तर असे अर्ज परत (Revert) न करता विभागीय ~~स्तरावरील~~ वरुन आपणास कोणत्याही प्रकारची सुचना न देता थेट नामंजूर ( Reject )करण्यात येईल, याची सर्व प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

( डॉ. मनोज भा. डायगव्हाणे )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर